## विठ्ठलाच्या दर्शनासाठी विक्रमी रांगा

**पुणे ।** पुण्यातून निघालेली पंढरपूर वारी सध्या फलटण परिसरात विसावली आहे. राज्याच्या विविध भागातून वारी घेऊन वारकरी मार्गस्थ झाले आहेत. हे वारकरी येण्यापूर्वीच पंढरपुरात वैष्णवजन गोळा झालेले आहेत. आषाढी एकादशीला अजून ७ दिवस बाकी असताना विठ्ठलाच्या दर्शनासाठी चार-चार किमीच्या रांगा लागल्या आहेत. आषाढी एकादशीच्या सोहळ्याला अजून ७ दिवसाचा अवधी आहे. अशातच पंढरपुरात विठ्ठलाच्या पदस्पर्श दर्शन रांगेत ५० हजार भाविक उभे आहेत. सध्या १० तासांचा कालावधी लागत आहे.


# देशदूत

शिल्पकार विकासाचा...


## मोसमी वाऱ्यांचा देशावर कब्जा

**मुंबई ।** नैऋत्य मोसमी वाऱ्यांनी रविवारी, २९ जून रोजी संपूर्ण देशावर कब्जा केला आहे. साधारणपणे ८ जुलै रोजी मोसमी वारे संपूर्ण देश व्यापतात. यंदा नऊ दिवस अगोदरच मोसमी वाऱ्यांनी संपूर्ण देश व्यापला आहे. देशात सर्वदूर मोसमी पाऊस पडण्यास अनुकूल वातावरण असून, पुढील पाच दिवस देशाच्या बहुतेक भागात चांगला पाऊस पडेल, असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. हवामान विभागाच्या अंदाजित वेळेनुसार, साधारणपणे ८ जुलै रोजी नैऋत्य मोसमी पाऊस संपूर्ण देश व्यापतात.


इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | धुळे | वर्ष २८ । अंक २५० । सोमवार, दि.३० जून २०२५ । पाने-८ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर


## संपादकीय

### खड्ड्यांची 'समृद्धी'?

खड्ड्यात गेलेले रस्ते वाहनचालकांच्या पाचवीला नेहमीच पूजलेले असतात. लोकांनी कितीही बोंबाबोंब केली तरी खड्डे तातडीने बुजवले जात नाहीत. रस्त्यांवर खड्डे पडण्यास निसर्गाला, म्हणजे पावसाला जबाबदार धरले जाते. कामचुकारपणा कोणाचा आणि दोष मात्र निसर्गाचा? विकासाची स्वप्ने दाखवणाऱ्या सत्ताधाऱ्यांचा 'स्वप्न प्रकल्प' असलेला मुंबई-नागपूरदरम्यानचा 'समृद्धी महामार्ग'सुद्धा आता खड्ड्यांना अपवाद राहिलेला नाही. महामार्गाच्या आमने ते इगतपुरी या शेवटच्या टप्प्याचे लोकार्पण नुकतेच वाजत-गाजत झाले. त्याला अजून पंधरवडाही लोटलेला नाही; तोच या टप्प्यातही महामार्गाला खड्डे पडले. प्रसार माध्यमांनी या महामार्गावरील 'खड्ड्यांची समृद्धी' वाचक-दर्शकांसमोर आणली. ते पाहून सगळेच आवाक झाले. रस्ते अथवा मार्गांवरील खड्ड्यांबाबत संबंधित खात्याकडून बेफिकिरी दाखवली जाते. वेगवान म्हणवल्या जाणाऱ्या समृद्धी महामार्गावर इतक्या लवकर खड्डे पडतील याची कोणीच कल्पना केलेली नसेल, पण खड्डे पडले हे खरे! त्याचा बराच गाजावाजा झाल्यावर महामार्गावरील खड्डे आणि त्याची मापे मोजली गेली. खड्डे 'नगण्य' असल्याचेही जाहीर केले गेले व ते तातडीने बुजवून वेळ मारुन नेण्यात आली. खड्ड्यांमळे महामार्गाचे काही नुकसान झाले नसल्याचे संबंधित अधिकाऱ्यांकडून ठासून सांगितले गेले. खड्ड्यांनी रस्त्यांचे नव्हे, तर वाहनचालक व त्यांच्या वाहनांचे नुकसान होते. अपघात घडतात. प्रसंगी ते जीवघेणे ठरतात. याचा सोयीस्कर विसर का पडावा? ही झाली 'समृद्धी'वरील खड्ड्यांची बात! राज्यातील छोट्या गावांतील रस्त्यांपासून जिल्हा आणि राज्यमार्गांचे हेच दुखणे आहे. दरपावसाळ्यात बहुसंख्य रस्ते 'खड्ड्यात' जातात, ते कसे? अधून-मधून रस्ते दुरुस्ती केली जाते. फक्त रस्ते दुरुस्ती आणि खड्डे बुजवण्यासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्ची घातला जातो. तरीही रस्त्यांवरील खड्डे 'जैसे-थे' का राहतात? दर्जेदार रस्ते बांधण्याच्या घोषणा केल्या जातात. नव्या तंत्राने बांधलेले रस्ते अनेक वर्षे खराब होणार नाहीत, त्यांना

पान २ वर

### केळी भाव

| | |
|---|---|
| नवती (१) | : 2225 |
| नवती (२) | : 2025 |

### मिरचीकोथिंबीर




## विजयाची चाहूल लागली

२९ ऑगस्टला मुंबईला जायचे आहे. २७ ऑगस्ट रोजी अंतरवालीतून निघायचे आहे. कुठेही न थांबता २८ ऑगस्टला रात्री मुंबईत पोहचायचे आहे. मुंबईतील सर्वच लोकांनी मागे आपली सेवा केली, त्यात परप्रांतीय लोकांनीसुद्धा आपली सेवा केली आहे. पावसाचे दिवस असून मला तुम्ही मुंबईत सोडायला या, पुढचे मी पाहतो. आता अशी संधी पुन्हा मिळणार नसून विजयाची चाहूल लागली आहे, असे त्यांनी म्हटले.

## मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगेंचा सरकारला इशारा



**जालना ।** आता आपल्याला रणभूमीत उतरुन लढायचे, मैदान गाजवायचे अन् विजय खेचून आणायचाय. २७ ऑगस्ट रोजी अंतरवाली सराटी सोडायची अन् २९ ऑगस्टला मुंबई गाठायची. आता मागे हटायचे नाही. विजय मिळवायचा, त्याशिवाय मुंबईतून वापस फिरायचे नाही. आता ही लढाई आर-पारची आणि अंतिम असेल, असा इशारा मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील अंतरवाली सराटी येथे झालेल्या राज्यव्यापी बैठकीत दिला. या बैठकीदरम्यान 'एक मराठा लाख मराठा', 'लढंगे जितेंगे हम सब जरांगे', 'कोण आला रे कोण आला, मराठ्यांचा वाघ आला' अशा घोषणाही देण्यात आल्या. आपल्याला प्रत्येक वेळेस नाव ठेवले जायचे. एवढ्या प्रचंड संख्येने तुम्ही जमला, तुमच्यासमोर नतमस्तक होतो. जातीसाठी किती ताकतीने लढावे, हे सर्व देशाला तुम्ही दाखवून दिले. मराठा समाजाची दोन वर्षापासून संघर्षाची लढाई चालू असून, आता आता मराठ्यांनी जिंकायचे म्हणजे जिंकायचे, असा निर्धारही जरांगे पाटलांनी यावेळी केला. राजकीय लोक त्यांच्या पक्षासाठी, निवडणुकीसाठी रात्र-दिवस मरमर करतात, मात्र तुमच्यासाठी, तुमच्या लेकरासाठी व तुमच्या जातीसाठी कोणीच मरमर करत नाहीत. कोणत्याही पक्षाचा मराठा असू द्या, त्यांनी आपल्या लेकराच्या अंगावर गुलाल टाकण्यासाठी सज्ज राहा. आता फक्त आठ नऊ टक्केच मराठा आरक्षणामध्ये जायचे राहिला आहेत, हे सरकारलाही माहित आहे, असेही त्यांनी यावेळी म्हटले.

## आपल्याला कोणीही थांबवू शकत नाही

या बैठकीनंतर मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी माध्यमांशी संवाद साधला. आपल्याला रणभूमीत उतरायचे आहे आणि विजयही निश्चित मिळवायचा आहे. रणभूमीची तयारी अशी असली पाहिजे की, यावेळी यश आपलेच असणार, असे ठाम शब्दांत मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले, आपल्याला कोणीही थांबवू शकत नाही. मैदान आपणच गाजवायचे असून, विजयाचा गुलालही आपल्या अंगावरच उधळला गेला पाहिजे. मागील दोन वर्षांपासून मराठा समाजासाठी आंदोलन सुरू असून, आता ही लढाई अंतिम टप्प्यात आली आहे. ही शेवटची लढाई मराठ्यांनी जिद्दीने आणि एकजुटीने पार पाडली पाहिजे, असे आवाहनही त्यांनी मराठा बांधवांना केले.

# केळीवर पुन्हा अस्मानी संकट

## रावेर तालुक्याला वादळाचा तडाखा; शेकडो हेक्टरवरील केळी जमीनदोस्त

**रावेर ।** शेतकऱ्यांवर सुरू असलेल्या अस्मानी सुलतानी संकटाची मालिका सुरूच आहे. वेगवेगळ्या भागात मे-जून महिन्यात मोठ्या प्रमाणात केळीचे नुकसान झाले होते. ते पंचनामे पूर्ण करत नाही, तोच पुन्हा वादळाचा केळीला फटका बसला आहे. चिनावल, राझोदा, रावेर, पुनखेडा, पातोंडी, निंबोल, ऐनपूर, थेरोळा या भागात वादळाने मोठा झटका दिला आहे. याबाबत प्रशासनाला प्राथमिक माहिती मिळाली असून दि.२९ रोजी सायंकाळी उशिराने वादळ आल्याने, शेती शिवारात झालेल्या नुकसानीचा स्पष्टपणे अंदाज मिळणे अवघड आहे. याबाबत सोमवारी सकाळी नुकसानीचा पूर्णपणे अंदाज समजू शकतो. कृषी विभाग व महसूल विभाग याबाबत आढावा घेत असल्याची माहिती मिळाली आहे.

मे आणि जूनमध्येदेखील रावेर तालुक्यात मोठ्या प्रमाणात वादळाने केळीचे नुकसान झाले होते. या नुकसानीचे आताच पंचनामे पूर्ण झाले आहेत. यात ३३ गावात २६ कोटींचे नुकसान झाल्याचे पंचनाम्यातून स्पष्ट झाले होते. नुकसानीची मालिका सुरूच असून, दि. २९ रोजी पुन्हा रावेर तालुक्यात वादळाने हजारो हेक्टर केळीचे नुकसान झाले आहे. यात चिनावल, रोझोदा, रावेर, पुनखेडा, पातोंडी, थेरोळा, धुरखेडा, निंभोरासिम, अहिरवाडी, खानापूर, निंबोल, ऐनपूर, सुलवाडी, कोळदा भागातील केळी रविवारी सायंकाळी झालेल्या वादळात जमीनदोस्त झाली आहे. नुकसान मोठ्या प्रमाणात झाले असून नुकसानीचा प्राथमिक अंदाज मिळण्यात अडचणी येत आहे. याबाबत सोमवारी स्पष्टपणे नुकसानीची तीव्रता कळेल, अशी माहिती तहसीलदार बी.ए.कापसे यांनी 'देशदूत'शी बोलताना दिली.



### कोट्यवधींचे नुकसान

रविवारी संध्याकाळी झालेल्या वादळाने रावेर तालुक्यात ६८६ शेतकऱ्यांचे ३४२ हेक्टर वरील केळीचे नुकसान झाले आहे. याबाबत कृषी अधिकारी भाऊसाहेब वाळके यांनी प्राथमिक अंदाज जाहीर केला आहे.

यात जानोरी येथे ९ शेतकऱ्यांचे ४ हेक्टर, कळमोदा येथील ३७ शेतकऱ्यांचे १५ हेक्टर, खिरोदा येथील २० शेतकऱ्यांचे १५ हेक्टर, सावखेडा येथील ३२ शेतकऱ्यांचे १६ हेक्टर, चिनावल येथील ५५ शेतकऱ्यांचे २९.५५ हेक्टर, कुंभारखेडा येथील ३४ शेतकऱ्यांचे १८ हेक्टर, निंभोरा येथील २० शेतकऱ्यांचे ११.५० हेक्टर, खिर्डी बुद्रूक येथील १५ शेतकऱ्यांचे ८ हेक्टर, खिर्डी खुर्द येथील १० शेतकऱ्यांचे ६ हेक्टर, विवरे बुद्रूक येथील २६ शेतकऱ्यांचे १५ हेक्टर, विवरे खुर्द येथील ८ शेतकऱ्यांचे ५ हेक्टर, रेंभोटा येथील ८ शेतकऱ्यांचे ४.५० हेक्टर, वाघोदा येथील ५० शेतकऱ्यांचे २६ हेक्टर, रावेर येथील ५० शेतकऱ्यांचे १७ हेक्टर, ऐनपूर येथील १६ शेतकऱ्यांचे ९ हेक्टर, पुनखेडा येथील १० शेतकऱ्यांचे ५ हेक्टर, पाटोंडी येथील १६ शेतकऱ्यांचे ८ हेक्टर, कोचूर येथील १२ शेतकऱ्यांचे ६ हेक्टर, सावदा येथील ३७ शेतकऱ्यांचे १८.५० हेक्टर, दसनूर येथील १३ शेतकऱ्यांचे ५.५० हेक्टर, वाघाडी येथील ६ शेतकऱ्यांचे ४ हेक्टर, उटखेडा येथील १५ शेतकऱ्यांचे ९ हेक्टर, भाटखेडा येथील १५ शेतकऱ्यांचे ८ हेक्टर, कुसुंबा येथील १० शेतकऱ्यांचे ४ हेक्टर, कुसुंबा खुर्द येथील ६ शेतकऱ्यांचे ३ हेक्टर, रोझोदा येथील २४ शेतकऱ्यांचे १२ हेक्टर, तांदळवाडी येथील ४८ शेतकऱ्यांचे २० हेक्टर, निंबोल येथील २५ शेतकऱ्यांचे १२ हेक्टर, खिरवड येथील ३० शेतकऱ्यांचे १५ हेक्टर, थेरोळे येथील १९ शेतकऱ्यांचे ८ हेक्टर, गौरखेडा येथील १० शेतकऱ्यांचे ४ हेक्टरवरील केळीचे नुकसान होऊन यात ६८६ शेतकऱ्यांचे ३४२ हेक्टरवरील केळीचे नुकसान झाले आहे. याबाबत कृषी अधिकारी भाऊसाहेब वाळके यांनी प्राथमिक अंदाज वर्तवला आहे.

## 'आप'ने केली दोन आमदारांची हकालपट्टी



**गुजरात ।** दिल्ली विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर आम आदमी पार्टीने गुजरात व पंजाबमधील विधानसभा पोटनिवडणूक जिंकून दमदार पुनरागमन केले. मात्र, विजयाचा गुलाल फिका पडण्याआधीच 'आप'चे प्रमुख अरविंद केजरीवाल यांनी दोन आमदारांची पक्षातून हकालपट्टी केली आहे. त्यामुळे आम आदमी पार्टीत नेमके चाललेय तरी काय, असा प्रश्न अनेकांना पडला आहे.

गुजरातमधील विसावर विधानसभा पोटनिवडणुकीत भाजपाच्या उमेदवाराला पराभूत करून आपचे उमेदवार गोपाल इटालिया यांनी विजयी गुलाल उधळला. तर, पंजाबमधील लुधियाना मतदारसंघात आम आदमी पार्टीचे उमेदवार संजीव अरोरा यांनी काँग्रेसच्या भारतभूषण आशू यांचा १० हजार मताधिक्याने पराभव केला. पंजाब व गुजरातमध्ये आणखी दोन वर्षांनी २०२७ मध्ये विधानसभेची निवडणूक होणार असल्याने या विजयामुळे 'आप'चा आत्मविश्वास चांगलाच वाढला आहे. मात्र, या विजयाचा गुलाल फिका पडण्याआधीच पक्षाने दोन आमदारांची तडकाफडकी हकालपट्टी केली आहे. पंजाबमधील

पान २ वर

### उमेश मकवाना यांनी केले होते आरोप

विसावदरच्या पोटनिवडणुकीत पटेल समुदायातील गोपाल इटालिया यांच्यासाठी आपचे संपूर्ण नेते प्रचारात गुंतले होते. त्यांनी कोट्यवधी रुपयांचा खर्च केल्याने ते निवडून आले. कडीचा उमेदवार गरीब आणि दलित असल्यामुळे पक्षाने त्याला एकटे सोडले. अशा प्रकारचा भेदभाव खपवून घेतला जाणार नाही. मागासवर्गीय आणि ओबीसी समुदायांचा वापर फक्त निवडणुकीच्या काळात मतदानासाठी केला जातो. मी ज्या कोळी समुदायाचे प्रतिनिधित्व करतो, त्या समाजातील नेत्यांचाही वापर फक्त निवडणुकीपुरताच केला जातो, असेही मकवाना म्हणाले होते.



मुंबई । विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला सह्याद्री अतिथीगृह येथे चहापान कार्यक्रम पार पडला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह मंत्रिमंडळातील सर्व मंत्री उपस्थित होते.

## महाराष्ट्र द्वेष्ट्यांच्या चहापानावर बहिष्कार-अंबादास दानवे



**मुंबई ।** राज्यातील बिघडलेली कायदा-सुव्यवस्था, शेतकऱ्यांप्रती सरकारची असंवेदनशीलता, बळीराजाची होत असलेली दयनीय अवस्था, विविध भ्रष्टाचारात मंत्र्यांचा हात यामुळे सरकारने पावसाळी अधिवेशनापूर्वी आयोजित केलेल्या चहापान कार्यक्रमावर बहिष्कार घालत असल्याची भूमिका महाविकास आघाडीने घेतल्याची माहिती विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी दिली. यावेळी महाराष्ट्र द्वेष्ट्यांच्या चहापान कार्यक्रमाला जायचे म्हणजे पापच, अशी प्रतिक्रिया ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी दिली. महाविकास आघाडीच्या नेत्यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर २९ जून रोजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या अजिंक्यतारा या शासकीय निवासस्थानी पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.




मुंबई । शिवसेना ठाकरे गटाकडून आझाद मैदानात महायुती सरकारने काढलेल्या हिंदी सक्तीच्या आदेशाची प्रतीकात्मक होळी करण्यात आली. यावेळी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, शिवसेना खा.संजय राऊत आदी उपस्थित होते.

## कर्नाटकात काँग्रेसचा बी प्लान अखेर लीक

**कर्नाटक ।** कर्नाटकचे काँग्रेस आमदार एच. ए. इक्बाल हुसेन यांनी रविवार, २९ जून रोजी मोठा दावा केला आहे. त्यांच्या या दाव्यानुसार कर्नाटकात मोठा उलटफेर होण्याची शक्यता आहे. कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डीके शिवकुमार यांना पुढील दोन ते तीन महिन्यांच्या आत राज्याचे मुख्यमंत्री होण्याची संधी मिळू शकते, असे हुसेन यांनी म्हटले आहे. महत्वाचे म्हणजे, या वर्षाच्या अखेरपर्यंत कर्नाटकात नेतृत्व बदल होईल, अशी शक्यता वर्तवली जात असतानाच हुसेन यांचे हे विधान आले आहे. हुसेन हे शिवकुमार यांचे अगदी जवळचे मानले जातात. काँग्रेस आमदार हुसेन म्हणाले की, हा विजय मिळवण्यासाठी कुणी संघर्ष केला? कुणी घाम गाळला? हे सर्वांनाच माहीत आहे. शिवकुमार यांची रणनीती आणि कार्यक्रम आता इतिहास आहे. हुसेन रामनगर येथे पत्रकारांसोबत बोलत होते. यावेळी, शिवकुमार यांना मुख्यमंत्री होण्याची संधी होती? असा प्रश्न केला असता, हुसेन म्हणाले, मी अनुमानांवर विश्वास ठेवत नाही.

# शालेय शैक्षणिक धोरणात हिंदीची सक्ती रद्द!

## दोन्ही शासन निर्णय मागे घेतल्याची मुख्यमंत्री फडणवीसांची घोषणा



**मुंबई ।** शालेय शिक्षणात इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषा सक्तीच्या निर्णयावरुन मोठा वाद निर्माण झाला आहे. शिवसेना ठाकरे गट आणि मनसे पक्ष या निर्णयाविरोधात येत्या ५ जुलैला भव्य मोर्चा काढणार होते. तसेच विविध पक्षांकडून या निर्णयाला विरोध होत होता. त्यामुळे महाराष्ट्र सरकारने आता मोठा निर्णय घेतला आहे. विधी मंडळाचे आजपासून पावसाळी अधिवेशन सुरु होत आहे. या अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला २९ जून रोजी मुंबईत सह्याद्री अतिथीगृह येथे चहापानाचा कार्यक्रम पार पडला. त्यानंतर राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत हिंदी भाषेबाबत मोठा निर्णय घेण्यात आला. मंत्रिमंडळ बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांची एकत्रित पत्रकार परिषद पार पडली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिंदी भाषेबाबत याआधी घेतलेले दोन्ही शासन निर्णय मागे घेत असल्याची घोषणा केली आहे.

### देवेंद्र फडणवीस काय म्हणाले?

हिंदीचा विषय हा आमच्याकरिता मराठीचा विषय आहे. आम्ही राज्यात मराठी अनिवार्य केली आहे. कुणालाही भारतीय भाषा शिकता येईल, असा निर्णय आम्ही घेतला आहे. तरीही झोपलेल्याला उठवता येते पण झोपेचे सोंग करणाऱ्याला उठवता येत नाही. हिंदी ऑप्शनल आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे सर्वात आधी कर्नाटकने लागू केले. त्यानंतर मध्य प्रदेश, तेलंगणा, उत्तर प्रदेशने

पान २ वर

### ५ जुलैचा मोर्चा स्थगित

राज्य सरकारच्या या भूमिकेनंतर ५ जुलैला एकत्रित मोर्चा निघणार नाही, असे संजय राऊत यांनी स्पष्ट केले आहे. हिंदी सक्तीचा सरकारी आदेश रद्द! हा मराठी एकजुटीचा विजय आहे. ठाकरे एकत्र येणार याचा धसका सरकारने घेतला आहे. ५ जुलैचा एकत्रित मोर्चा आता निघणार नाही; पण.. ठाकरे हाच ब्रँड! फडणवीस यांनी हा शहाणपणाचा निर्णय घेतला असल्याचेही ते म्हणाले.

## मतदानापासून ८ कोटी लोकं दूर-तेजस्वी यादव

**पटना ।** बिहार विधानसभेतील विरोधी पक्षनेते तेजस्वी यादव यांनी यावरून केंद्राला लक्ष्य केले आहे. निवडणूक आयोगाने मतदार यादीच्या स्पेशल इंटेंसिव्ह रिव्हिजन (एसआयआर)बाबत विरोधी पक्षांच्या वाढत्या चिंतेदरम्यान राष्ट्रीय जनता दलचे नेते तेजस्वी यादव यांनी या प्रक्रियेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. सध्याच्या मतदार याद्या रद्द करण्याचा आणि सर्व नागरिकांना नव्यानं अर्ज करण्याची गरज असल्याचा निर्णय अचानक घेतला गेला आहे. त्यामुळे भाजपाच्या नेतृत्वाखालील एनडीए सत्तेत आल्याच्या निवडणुकांच्या वैधतेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित होते. ही प्रक्रिया केंद्राच्या इशाऱ्यावर केली जात आहे. भाजपा आणि त्यांचे सहयोगी मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखालील जनता दल विधानसभा निवडणुकीपूर्वी घाबरून जात आहेत, असे तेजस्वी यांनी म्हटले. बिहारच्या ८ कोटी लोकांना बाजूला सारत नवीन मतदार यादीचा घाट घातला जात आहे, असाही आरोप त्यांनी केला.


धुळे ■ जळगाव ■ धुळे ■ नंदुरबार ■ नाशिक ■ अहमदनगर येथून एकाच वेळी स्वतंत्रपणे प्रकाशित www.facebook.com/deshdoot www.instagram.com/deshdoot twitter.com/deshdoot Youtube : Daily Newsgram


cmyk